आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ जुलै २०२४ - मंगळवार

संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज लोकसभेत उत्तर देणार आहेत. राज्यसभेत प्रधानमंत्री उद्या बोलतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची बैठक आज संसदभवनात झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावावरची चर्चा संसदेच्या दोन्ही सभागृहात आज पुढं सुरू झाली.

<><><><><>

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्तावा वरच्या चर्चेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज विधानसभेत उत्तर देत आहेत.

महाडच्या चवदार तळ्याच्या सुधारणेसाठी ६५ कोटी रूपयांचा प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याला १५ दिवसात उच्चस्तरीय समितीकडून मंजुरी देऊन, काम सुरू करू असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिलं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं इंदू मिल इथलं स्मारक, चवदार तळे यांच्या विकास कामाबद्दल सरकार उदासीन असल्याचं विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार म्हणाले. नागपूर मधे दीक्षाभूमी इथल्या भूमिगत पार्किंगविरोधात आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांवर लाठीमार झाल्याचा त्यांनी निषेध केला, तसंच परिस्थिती नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीनं अध्यक्षांनी पाहणी समिती पाठवावी, अशी मागणी केली.

<><><><><>

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचं पाच दिवसांसाठी निलंबन करण्याचा ठराव आज विधानपरिषदेत आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा ठराव मांडला. यासंदर्भात विरोधकांची बाजू ऐकून घ्यावी, असा आग्रह विरोधी पक्षांनी केला, मात्र अशा प्रकारच्या ठरावांवर कधीही चर्चा होत नाही, असं

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. यावर विरोधकांनी हौद्यात उतरून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या विरोधात घोषणा दिल्या आणि सभात्याग केला. या गदारोळातच विविध विषयांवरची कागदपत्रं सभागृहासमोर ठेवण्यात आली.

विरोधकांच्या सभात्यागानंतर डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितलं की, या विषयावर झालेल्या गटनेत्यांच्या बैठकीला अंबादास दानवे उपस्थित नव्हते, आपल्याकडून झालेल्या वर्तनाबाबत कोणतीही अपराधीपणाची भावना त्यांच्या वर्तनात नव्हती. याला आळा घातला नाही तर महिलांना असुरक्षित वाटेल, असं वातावरण निर्माण होईल. ते होऊ नये, यासाठी हा निर्णय घेतला असल्याचं गोऱ्हे यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी ६५ वर्ष वयापर्यंतच्या लाभार्थ्यंना देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय जमिनीची अट काढून टाकली आहे, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिले. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना लगेच मदतीची रक्कम जमा करू. उर्वरित महिलांना अर्ज आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाली की जुलै पासूनचे पैसे दिले जातील असेही ते म्हणाले. राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर मुख्यमंत्री विधानसभेत उत्तर देत आहे.

<><><><><>

परिशिष्ट-२ जाहीर झाल्यानंतर झालेली झोपड्यांची हस्तांतरणं मान्य करण्याची कोणतीही तरतूद प्रचलित शासन निर्णयामध्ये नसल्यामुळे मुंबईतल्या बहुसंख्य झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये निर्माण झालेला तिढा सोडवण्यासाठी एक विशेष सवलत योजना जाहीर करण्याची तयारी  गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज विधानसभेत दर्शवली. याबाबत अधिवेशन  काळात मुख्यमंत्री,

उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत एक उच्च स्तरीय बैठक बोलावण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं.

<><><><><>

विधानपरिषदेच्या चार जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर यांनी मुंबई शिक्षक मतदारसंघात विजय मिळवला तर मुंबई पदवीधर मतदारसंघात अनिल परब निवडून आले. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाचे निरंजन डावखरे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला. नाशिक शिक्षक मतदारसंघात शिवसेनेचे किशोर दराडे विजयी झाले.

<><><><><>

विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी द्वैवार्षिक निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. भाजपाचे उमेदवार पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे यांनी आज अर्ज भरला. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, तर शिवसेनेकडून कृपाल तुमाणे आणि भावना गवळी यांनी अर्ज भरला. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मिलिंद नार्वेकर आणि शेकापचे जयंत पाटील यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

<><><><><>

संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आज दुपारी हडपसर इथं विसाव्याला थांबणार असून रात्री सासवडला मुक्काम करणार आहे. संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचा विसावा दुपारी हडपसर इथं असून, लोणी काळभोर इथं रात्री पहिला मुक्काम आहे.

//<><><><><>//